आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्तविभाग
राष्ट्रीय बातमीपत्र
सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

दिनांकः11.08.2026 वारःमंगळवार

---

1. विद्यार्थी आंदोलनाबाबत चर्चेला सरकार तयार असल्याची केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांची संसदेत माहिती
2. भारतात परदेशी नागरिकांच्या प्रवेशासाठी आणखी अकरा आंतरराष्ट्रीय प्रवेश ठिकाणांची अधिसूचना केंद्र सरकारकडून प्रसिद्ध.
3. कृषी क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्ती आणि पाठ्यवृत्तींसाठीचा निधी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलच्या माध्यमातून वितरित.
4. कोलंबियात भूकंपामुळे 132 पेक्षा जास्त जणांचा मृत्यू, तर 570 जण जखमी आणि
5. नायजेरियात सुरू असलेल्या 23 वर्षांखालील राष्ट्रकुल तलवारबाजी स्पर्धेत पहिल्याच दिवशी 17 पदकं जिंकत भारताची दमदार सुरुवात.

**<u>रिजिजू</u>**

अलीकडेच झालेली विद्यार्थ्यांची आंदोलनं आणि त्याच्याशी संबंधित मुद्द्यांवर संसदेत सविस्तर चर्चा करण्यास सरकार तयार असल्याचं केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी काल सांगितलं. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीनंतर संसदेच्या आवारात ते पत्रकारांशी बोलत होते. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभागृहात शिस्त पाळून कामकाजात यापुढे अडथळा आणू नये असं आवाहनही त्यांनी. विरोधकांनी सभागृहाचं कामकाज चालू दिल्यास गृहमंत्री अमित शाह यांना विद्यार्थी आंदोलनाबाबत निवेदन देणं आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांच्या सर्व शंकांचं निरसन करणं शक्य होईल, असं रिजिजू म्हणाले.

**<u>झारखंड आंदोलन</u>**

झारखंडमधील विद्यार्थी आंदोलक नेते देवेंद्रनाथ महातो यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. काल रांचीमध्ये झालेल्या मोर्चाच्या वेळी जखमी झाल्यानंतर प्रकृती आणखी बिघडल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. पोलिसांनी लाठीमार केल्याचा आरोप महातो यांनी केला आहे. भारतीय जनता पक्षानं पोलिसांनी विद्यार्थ्यांविरुद्ध केलेल्या लाठीमाराच्या निषेधार्थ झारखंड बंद पुकारला आहे.

**<u>संसद अधिवेशन</u>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या चौथ्या आणि अंतिम आठवड्याला कालपासून सुरुवात झाली. मात्र, नीट पेपरफुटीवरून आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिसांच्या कारवाईसह इतर विविध मुद्द्यांवरून गदारोळाचं सत्र सुरूच राहिल्यानं लोकसभेचं कामकाज कालही दिवसभरासाठी तहकूब झालं.

दिल्लीत विद्यार्थी आंदोलकांवर झालेल्या पोलिसांनी केलेल्या अवाजवी बळाच्या वापराचा मुद्दा उपस्थित करत विरोधी पक्ष सदस्यांनी केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या निवेदनाची मागणी केली. विधी आणि न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी न्यायाधिकरण सुधारणा विधेयक सादर केलं. विरोधकांच्या गदारोळातच हे विधेयक सभागृहात मंजूर झालं. त्यानंतर कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

राज्यसभेत काल 'बँकर्स बुक एव्हिडन्स (बँक नोंदी पुरावा) विधेयक, 2026' ला काल जुजबी चर्चेनंतर आवाजी मतदानानं मंजुरी देण्यात आली. यावेळी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभात्याग केला. लोकसभेनं हे विधेयक यापूर्वीच मंजूर केलं होतं. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी हे विधेयक मांडलं; बँकिंग प्रणालीच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी वैधानिक चौकटीत आधुनिक काळानुरुप बदल करणं हा या विधेयकाचा उद्देश आहे. तसंच, बँकेच्या नोंदींची इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल प्रत पुराव्यासाठी ग्राह्य, वैध आणि कायदेशीररीत्या अंमलबजावणीयोग्य असेल, अशी तरतूदही या विधेयकात करण्यात आली आहे.

राज्यसभेत काल 'करआकारणी आणि इतर कायदे सुधारणा' विधेयकही संमत करण्यात आलं. लोकसभेनं हे विधेयकही यापूर्वीच मंजूर केले आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी हे विधेयक मांडलं. गोंधळामुळे राज्यसभेच्या कामकाजात वारंवार येणाऱ्या अडथळ्यांमध्येच ही विधेयकं मंजूर करण्यात आली. त्यानंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**कृषी-शिष्यवृत्त्या**

कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाचे मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी कृषी क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्ती आणि पाठ्यवृत्तींसाठीचा निधी काल वितरित केला. राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टल म्हणजे एनएसपीच्या माध्यमातून हा निधी वितरित करण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत सहा हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना थेट रक्कम हस्तांतर म्हणजे डीबीटीच्या माध्यमातून 21 कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी मिळाला आहे. या प्रसंगी बोलताना चौहान म्हणाले, की या शिष्यवृत्ती म्हणजे फक्त आर्थिक मदत नसून कृषी शिक्षणाला बळकटी देण्याचा आणि त्याला व्यावहारिक शिक्षण आणि संधींची जोड देण्याचा तो महत्त्वाचा भाग आहे. एनएसपी आणि डीबीटी या दोन प्रणाली एकत्रित आल्यामुळे शिष्यवृत्तींच्या निधीचं वितरण पारदर्शी, जलद आणि कोणत्याही अडथळ्याशिवाय पार पडेल, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**प्रवेश-अधिसूचना**

केंद्र सरकारनं परदेशी नागरिकांच्या प्रवेशासाठी आणखी अकरा आंतरराष्ट्रीय प्रवेश ठिकाणांची अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे ई-व्हिसा धारक परदेशी प्रवाशांना प्रवेशासाठीच्या ठिकाणांची संख्या आता 88 वर गेली आहे. केंद्रीय गृह मंत्रालयानं याबाबत अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. नवीन ठिकाणांमध्ये भोपाळ आणि तिरुपती येथील विमानतळांसह अटारी आणि आगरताळा इथल्या लँड पोर्ट्सचा समावेश आहे. नवीन प्रवेश ठिकाणांमुळे इलेक्ट्रॉनिक व्हिसाचा आकर्षकपणा आणि वापर वाढेल, असं गृह मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. नवीन प्रवेश ठिकाणांच्या समावेशामुळे भारतात परदेशी नागरिकांना ई-व्हिसाच्या माध्यमातून आता 37 विमानतळं, 38 सागरी बंदरं आणि 13 लँड पोर्ट्सवर प्रवेश करता येणार आहे.

**कोलंबिया-भूकंप**

कोलंबियाच्या पश्चिम भागाला काल 7 पूर्णांक 4 दशांश रिख्टर क्षमतेचा भूकंपाचा धक्का जाणवला. या भूकंपात किमान 132 लोकांचा मृत्यू झाला असून, 570 जण जखमी झाले. भूकंपामुळे शेकडो इमारतींचं नुकसान झालं असून, अद्याप अनेक लोक ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. या भूकंपाचा केंद्रबिंदू राजधानी बोगोटाच्या पश्चिमेला सुमारे 400 किलोमीटर अंतरावर होता. कोलंबियाचे अध्यक्ष अबेलार्डो डे ला एस्प्रिएला यांनी देशभरात आणीबाणी जाहीर केली आहे. इक्वेडोर आणि पनामा या शेजारील देशांनाही भूकंपाचे धक्के जाणवले.

**दौरा**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत पुढील महिन्यात अमेरिका दौऱ्यावर जाणार आहेत. संघाच्या जागतिक प्रसार मोहिमेचा भाग म्हणून हा दौरा आयोजित करण्यात आला आहे. 29 ऑगस्टला न्यूयॉर्क इथल्या मॅडिसन चौक गार्डन इथं एका कार्यक्रमाला मोहन भागवत संबोधित करणार आहेत. सुमारे पाच हजार नागरिक कार्यक्रमाला उपस्थित राहणार असून, सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित करण्यात येणार आहेत. रक्षाबंधनाच्या सणाच्या निमित्तानं एकता, नागरी उत्तरदायित्व आणि सलोखा यांचा संदेश देण्यासाठी अहेड या संस्थेतर्फे या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

**अमेरिका-अदानी**

अमेरिकेतील फेडरल न्यायालयानं उद्योगपती गौतम अदानी यांच्याविरुद्धच्या कथित लाच आणि गैरव्यवहार प्रकरणी दाखल करण्यात आलेले गुन्हे रद्द केले आहेत. फेडरल न्याय विभागानं याबाबत केलेल्या विनंतीवरून ब्रुकलीनचे न्यायमूर्ती निकोलस गरॉफिस यांनी हे गुन्हे रद्द केले. मात्र, न्याय विभागाच्या निर्णयाबाबत त्यांनी चिंताही व्यक्त केली. दरम्यान, न्यायालयाच्या निकालाचं अदानी यांनी स्वागत केलं आहे आणि न्यायालयीन प्रक्रियेबाबत आदर व्यक्त केला आहे.

**गोयल-ईमार्केटप्लेस**

गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस अर्थात जीईएम हे, योग्य गुणवत्तेच्या, योग्य किंमतीवर, योग्य वेळी योग्य उत्पादनाची खरेदी प्रतिबिंबित करते असं प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी केलं आहे. ते काल नवी दिल्लीत जीईएमच्या 10 व्या स्थापना दिनानिमित्त बोलत होते. खरेदीदार, विक्रेते आणि इतर भागधारकांना मदत मिळावी आणि जीईएमची अधिकृतता सिद्ध होण्यासाठी 14550 या पांच अंकी हेल्पडेस्क क्रमांकाचं अनावरण गोयल यांच्या हस्ते यावेळी करण्यात आला.

**सचिव बदल्या-पूल-मंदार**

केंद्रात वरिष्ठ स्तरावर प्रशासकीय बदल्या काल करण्यात आल्या. कॉर्पोरेट व्यवहार विभागाच्या सचिव दीप्ती गौर मुखर्जी आता नवीन उच्चशिक्षण सचिव असतील. यापूर्वीचे सचिव विनीत जोशी यांची पंचायती राज्य विभागाचे सचिव म्हणून नेमणूक करण्यात आल्यानं त्यांची जागा आता मुखर्जी घेतील. नीट प्रश्नपत्रिका फूट प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर या नेमणुकीला महत्त्व आहे. युवककल्याण विभागाच्या सचिव पल्लवी जैन आता कॉर्पोरेट व्यवहार सचिव असतील. केंद्रीय मंत्रिमडळ सचिवालयाचे विशेष कार्य अधिकारी सुशीलकुमार लोहानी यांची जलमार्ग प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

**चीन उपग्रह**

चीनमध्ये एक दळणवळण उपग्रह घेऊन जाणाऱ्या प्रक्षेपकात अचानक बिघाड झाल्यामुळे प्रक्षेपण अयशस्वी ठरलं. याबाबत चौकशी करण्यात येत आहे. चायनासॅट चार बी या नावाचा उपग्रह लॉंग मार्च 7 ए या प्रक्षेपकाच्या माध्यमातून चीनमधल्या हैनानमधून प्रक्षेपित करण्यात येत होता. मात्र, उड्डाणाच्या वेळी प्रक्षेपकामध्ये बिघाड झाला. मार्च 2020 नंतर पहिल्यांदाच लॉंग मार्च 7 ए या प्रक्षेपकामध्ये बिघाड झाल्याची घटना घडली आहे.

**राष्ट्रवादीखासदारभेट-मुंबई-मंजिरी**

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकारी अध्यक्ष सुप्रिया सुळे यांच्यासह पक्षाच्या सर्व 8 खासदारांच्या शिष्टमंडळानं काल दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यावेळी राज्याशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. दुष्काळ, कांद्याचे दर, चंद्रभागा नदीतलं प्रदूषण इत्यादींसह या आपापल्या मतदारसंघातले प्रश्न या खासदारांनी पंतप्रधानांकडे मांडल्याचं सुप्रिया सुळे यांनी सांगितलं.

**तलवारबाजी-पदके**

नायजेरियाची राजधानी लागोसमध्ये सुरू असलेल्या 23 वर्षांखालील राष्ट्रकुल तलवारबाजी स्पर्धेत भारताने, स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी 17 पदकं जिंकत दमदार सुरुवात केली आहे. यात, चार सुवर्ण, चार रौप्य आणि नऊ कास्य पदकांचा समावेश आहे. या खेळाच्या तीनही प्रकारात भारतीय खेळाडूंनी वर्चस्व गाजवलं.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.